# हिंदु स्त्रियांची उन्नति आणि अवनति.

## याला जबाबदार कोण ?

ग्रं. सं. ठाणे
निबंध
१५०८.
९८६९

लेखकः—

ऑनरेबल डॉ. भी. रा. आंबेडकर, एम्. ए., पी. एच्‌डी.,
डी. एस्‌सी., बॅरिस्टर-अॅट्-लॉ, कायदेमंत्री,
भारत सरकार ( १९५१ )

अनुवादकः—

चांगदेव भवानराव खैरमोडे

REFBK-0011558

शकः—
यटी ऑफ् इंडिया
चतर्जी स्ट्रीट,
कलकत्ता, १२.

त पहिली ] १९६१ [ ७५ नये पैसे

# Books on Buddhism

## Maha Bodhi Society Publications

| | | Rs. nP. |
|---|---|---|
| 1 | Maha Bodhi Society's Diamond Jubilee Souvenir | 6–00 |
| | **Anagarika Dharmapala** | |
| 2 | Relationship between Hinduism and Buddhism | 0–37 |
| 3 | The Psychology of Progress | 0–75 |
| 4 | What did the Lord Buddha Teach? | 0–75 |
| 5 | World's Debt to Buddha | 0–50 |
| | **Kosetsu Nosu & Basil Crump** | |
| 6 | Mulagandhakuti Vihara Wall Paintings | 7–50 |
| 7 | The Life of Buddha in Frescoes | 2–50 |
| | **Devapriya Valisinha** | |
| 8 | Buddhist Shrines In India | 5–00 |
| 9 | Buddhist Way of Life | 0–25 |
| 10 | Guide to Buddha Gaya | 1–00 |
| | **Sister Vajira** | |
| 11 | Dharma-Chakka Pavattana Sutta | 0–25 |
| | **Alexandra David Neel** | |
| 12 | The Secret Oral Teachings in Tibetan Buddhist Sects | 2–50 |
| | **हिंदी** | |
| | **ए. के. नरेन** | |
| १३ | धम्मपद | १–५० |
| | **आनंद कौसलायन** | |
| १४ | भगवान बुद्ध | ०–१३ |
| १५ | बुद्धवचन | ०–७५ |
| १६ | आगम शास्त्र | १–५० |

# हिंदु स्त्रियांची उन्नति आणि अवनति.

## याला जबाबदार कोण ?

लेखक :–

ऑनरेबल डॉ. भी. रा. आंबेडकर, एम्. ए., पी. एच्‌डी.,
डी. एस्‌सी., बॅरिस्टर-ॲट्-लॉ, कायदेमंत्री,
भारत सरकार ( १९५१ )

अनुवादक :–

चांगदेव भवानराव खैरमोडे

प्रकाशक :–

महाबोधि सोसायटी ऑफ इंडिया

REFBK-0011558

आवृत्ति पहिली ] [ ७५ नये पैसे

प्रकाशक
देवप्रिय वलिसिंह,
प्रमुख चिटणीस,
महाबोधि सोसायटी ऑफ् इंडिया,
४-अ, बंकिम चतर्जी स्ट्रीट, कलकत्ता, १२.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

विक्रेते :-कार्यवाह
महाराष्ट्र दलित साहित्य संघ,
बी. डी. डी. चाळ नं. ६०।३५,
वरळी, मुंबई, १८

(प्रति १५००)

मुद्रक
लक्ष्मीबाई नारायण चौधरी,
निर्णयसागर प्रिन्टींग प्रेस,
कोलभाट स्ट्रीट, मुंबई २

# प्रास्ताविक

मुंबईंतील Eve's Weekly या साप्ताहिकाच्या २१ जानेवारी १९५० च्या अंकांत "Our New Republic" या शीर्षकाखालीं एक लेख प्रसिद्ध झाला होता. हिंदुस्थानांतील स्त्रियांचा सामाजिक दर्जा प्राचीन काळांत फार उच्च होता. पण तो नंतरच्या काळांत नीच झाला. याबद्दल जबाबदार कोणाला धरावें ? या मुद्द्यावर ऊहापोह करून लेखकानें असें दाखविण्याचा प्रयत्न केला कीं, बौद्धधर्मामुळें स्त्रियांचा दर्जा खालावला. (१) रामायण आणि महाभारत यांच्या काळांत स्त्रिया राज्यकारभारांत भाग घेत होत्या, परंतु (२) बुद्धाच्या तत्त्वज्ञानामुळें स्त्रियांचा दर्जा घसरत घसरत खालीं आला. कारण (३) बुद्धाचें मन स्त्रियांच्या संबंधीं कलुषित होतें. तो आपल्या अनुयायांना सदा सर्वकाळ सांगे कीं स्त्रियांच्यापासून सावध रहा. अशा अर्थाचे मुद्दे लेखकानें मांडले. आणि त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, बुद्धानें स्त्रियांचा दर्जा खालीं आणला, पण हिंदी राज्यघटनेनें तो पुनः पूर्वीप्रमाणें उंच केला. लेखकाच्या या विधानांना **लामा गोविंद** यांनीं उत्तर म्हणून जो लेख लिहिला तो **महाबोधि सोसायटी ऑफ इंडिया**, कलकत्ता, या संस्थेच्या **महाबोधि** मासिकाच्या मार्च १९५० च्या अंकांत (पा. ७९-८०) "The Position of women in Hinduism and Buddhism" या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झाला.

सीता ही श्री रामाची पत्नी. तिचा दर्जा काय होता ? तिच्या चारित्र्याबद्दल साशंक होऊन तिच्या पतीनें तिचा छळ केला. शेवटीं तिला टाकून दिलें. रामाच्या चारित्र्याबद्दल शंका घेण्यास व त्याला शिक्षा करण्यास सीतेला हक्क होता काय ? पांच पांडवांची पत्नी म्हणून राहिलेल्या द्रौपदीला आणखी दुसरे नवरे करण्याचा हक्क होता काय ? पांडवांनीं तिला जुगारांत घालविलें. आपल्या पांच नवऱ्यांना जुगारांत घालविण्याचा तिला हक्क होता काय ? इंग्लंडची राणी पहिली एलिझाबेथ ही अखंड कुमारी होती. तिच्या अनेक प्रियकरांपैकीं लॉर्ड इसेक्स हा एक होता. तिनें त्याचा शिरच्छेद केला. बायझनटाईन साम्राज्याच्या काळांत थियोडोस ही साम्राज्ञी झाली. ती मुळची गरीब घराण्यांतली आणि वेश्येचा धंदा करणारी. पण तिनें राज्यकारभार चोख केला. हीन कुलांत जन्मलेली आणि वेश्येचा धंदा करणारी हिंदु स्त्री पूर्वीच्या काळांत राणी झाली, याबद्दलचें एक तरी उदाहरण आहे काय ? जगांतील कांहीं देशांत कांहीं थोर स्त्रीरत्नें होऊन गेलीं. पण तीं अपवादा-

त्मक समजलीं पाहिजेत. सर्वसाधारणपणें स्त्रियांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्व देशांत सर्वकाळ संकुचित होता. हा दृष्टिकोन बुद्धाच्या तत्त्वज्ञानांतून, शिकवणुकींतून आणि आचरणांतून उत्पन्न झालेला नव्हता. कारण, बुद्धाची शिकवण पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ अशी कधींच नव्हती. ती जर तशी असती तर त्याला **प्रबुद्ध** हें उच्चतम नामाभिधान कधींहि मिळालें नसतें. विश्वांतील सर्व सजीव आणि निर्जीव वस्तूंना प्रज्ञा, करुणा आणि मैत्री या त्रिरत्नांकित दृष्टिकोनांतून तो पहात होता. म्हणूनच तो सर्व धर्मोपदेशकांमध्यें श्रेष्ठतम मानला गेला. स्त्री आणि पुरुष यांच्यांतील नैसर्गिक भेद आणि आकर्षणें लक्षांत घेऊन त्याबद्दल संघांतील भिक्षू आणि भिक्षुणी यांनीं सावधपणानें रहावें, हीच व्यवहारी दृष्टि बुद्धाची होती, म्हणून बुद्धानें संघांतील नियमांत कांहीं नियम कडक केलेले होते. त्या नियमांवरून तो स्त्रियांचा द्वेष्टा होता असें ठरविणें म्हणजे निव्वळ आततायीपणा होय.

अशा तऱ्हेची विचारसरणी मांडून लामानें ईव्हज् वुइक्लीच्या लेखांतील विधानें खोडून काढण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न **परम वंदनीय बाबासाहेब आंबेडकर** यांना अपुरा वाटला. म्हणून त्यानीं या विषयावर विस्तृत लेख लिहिला. तो **महाबोधि** मासिकाच्या मे–जून १९५१ च्या ( खंड ५९ ) अंकांत (पा. १३७–५१ ) "The Rise and Fall of the Hindu Women: Who is Responsible" या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झाला. बाबासाहेबांचें लेखन नेहमींच मौलिक, कांटेकोर आणि बुद्धिगम्य असतें, त्यांचा हा लेख तसाच आहे. त्याचा स्वैर मराठी अनुवाद करण्याची संधि मला सोसायटीनें ( Letters, No. 177–10–60 of 1–10–60, No. 187–10–60 of 17–10–60, and No. 200–10–60 of 7–11–60 ) दिली. हें काम मी विनामूल्य केलेलें आहे. मी सोसायटीचे आभार मानतों.

मासिकाचे अंक प्राध्यापक सौ. नलिनी पंडित आणि श्री. लोंढे यानीं मला वाचावयास दिले. मी त्यांचा आभारी आहें.

सोसायटीनें या पुस्तिकेच्या विक्रीचे हक्क **महाराष्ट्र दलित साहित्य संघ**, मुंबई, या संस्थेला ( Letter, No. 14–88–61, of 19–1–61 ) दिला, याबद्दल मी सोसायटीचे आभार मानतों.

१४७–अ, हिंदु कॉलनी, मुंबई, १४
२६–१–६१

**चां. भ. खैरमोडे**

अनुक्रम ३९८७० दि.
क्रमांक १५०७ नों. दि.

# हिंदु स्त्रियांची उन्नति आणि अवनति

## याला जबाबदार कोण?

**लेखकः**—ऑनरेबल डॉ. भी. रा. आंबेडकर,
एम्. ए., पी. एच्डी., डी. एस्सी.,
बॅरिस्टर-अॅट्-लॉ, कायदेमंत्री,
भारत सरकार.

९५५

"हिंदु धर्म आणि बौद्ध धर्म यांच्यांतील हिंदु स्त्रियांचें स्थान," या शीर्षकाखालीं **लामा गोविंद** यांचा लेख मार्च १९५० च्या **महाबोधि** मासिकाच्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. नीति आणि अनीति यासंबंधींची बुद्धाची सर्व शिकवण हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या अवनतीला प्रामुख्यानें कारणीभूत झाली, असा आक्षेप करणारा लेख २१ जानेवारी १९५० च्या **ईव्हज् वुइक्ली** या साप्ताहिकाच्या अंकांत प्रसिद्ध झालेला होता. त्या आरोपाला उत्तर म्हणून **लामा गोविंद** यांचा लेख **महाबोधि** मासिकांत प्रसिद्ध झालेला होता. बुद्धाच्या शिकवणीसंबंधीं जे आरोप करण्यांत येतात ते खोडून काढण्यास पुढें येणें, हें प्रत्येक बौद्धधर्मीयाचें कर्तव्य आहे. आणि तें **लामा गोविंद** यांनीं पार पाडलें. बुद्धाच्या एकंदर शिकवणीवर हल्ले करणें आणि आरोप करणें, ही प्रथा फार प्राचीन कालापासून आतांपर्यंत चालत आलेली आहे. आणि ती तशीच पुढें चालू देणें, हें इष्ट नव्हें. **ईव्हज् वुइक्ली** साप्ताहिकांत भगवान बुद्धावर आरोप करणाऱ्या लेखकापेक्षां श्रेष्ठ असलेले लोकहि असले आरोप नेहमीं करीत असतात. याचें कारण त्यांचा स्वार्थ. त्यांना बुद्धाचें विशाल व्यक्तिमाहात्म्य सहन होत नाहीं. आरोप करण्याच्या या मनोभूमिकेच्या मागें काय काय भावना दडून बसलेल्या असतात, याचा शोध लावला म्हणजे या सदैव आरोप करणाऱ्या लोकांच्या अंतरंगावर स्वच्छ प्रकाश पडेल. म्हणून हें संशोधन करणें अत्यंत जरूर आहे. हे आरोप इतके भयंकर आणि अमंगल असतात कीं, ते करणाऱ्या

लोकांच्या भूमिकेचें विस्तृत विवेचन करणें, हें **महाबोधीच्या** वाचकांना मनापासून आवडेल.

बुद्धाची शिकवण स्त्रियांच्या अवनतीला कारणीभूत झाली, हा जो आरोप करण्यांत आलेला आहे; त्याला आधार फक्त दोन ठिकाणीं मिळतात.

बुद्धानें आनंदाच्या प्रश्नाला जें उत्तर दिलें होतें त्याचा उल्लेख 'महापरिनिब्बाणसुत्त', अध्याय ५, यांत आलेला आहे. तो असा:—

"९. आमचा स्त्रियांशीं संबंध आला तर आम्ही त्यांच्यांशीं कसें वागावें? आनंदानें भगवंताला विचारलें. आपण त्यांना पाहिलेंच नाहीं, असें वागावें, भगवंत म्हणाले.

पण, त्यांना पहाणें आम्हांला भाग पडलें तर आम्ही काय करावें? आनंदानें विचारलें.

तुम्ही त्यांच्यांशीं बोलूं नये! भगवंत म्हणाले.

पण, भगवंत! त्यांनाच आम्हांशीं बोलावें लागलें तर आम्हीं काय करावें? आनंदानें विचारलें. भगवंत म्हणाले, आनंदा! अशा वेळीं तुम्हीं सावधान वृत्तीनें त्यांच्यांशीं वागलें पाहिजे!"

हा आधार ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें प्रसिद्ध केलेल्या महापरिनिब्बाण सुत्ताच्या आवृत्तींत आहे. हें कोणीही नाकारूं शकत नाहीं. हा मजकूर सदर आवृत्तींत आहे किंवा नाहीं, हा मुद्द्याचा प्रश्न नाहीं. ज्या मजकुराच्या आधारावर वादविवाद करावयाचा तो मजकूर मुळचाच आणि सत्य आहे, कीं तो नंतरच्या भिक्कूंनीं घुसडून दिलेला आहे, हें ठरविणें, हा मुद्द्याचा प्रश्न आहे.

बुद्धाच्या शिकवणींतील प्रमुख अंगें कोणतीं, याचें ज्ञान ज्याला झालेलें आहे त्याला सुत्त पिटक सध्यां ज्या अवस्थेंत आहे, तें पाहून आश्चर्य वाटेल. सुत्त पिटक सध्यां कोणत्या अवस्थेंत आहे? भगवंत बुद्धाच्या शिकवणीशीं असंबद्ध वाटणाऱ्या कल्पना आणि ब्राह्मणी विचारसरणीच्या पौराणिक कथा बुद्ध देवाच्या नांवाखालीं त्यांत घुसडलेल्या आहेत. ब्राह्मणी मठसंप्रदायांतील

रहाणीची अवास्तव वर्णनें त्यांत घालण्यांत आलेलीं आहेत. ती रहाणी हीच आदर्शमय होय. तीच बौद्ध धर्माची आदरणीय आचारपद्धति होय. हें सर्व भासविण्यांत आलेलें आहे. सुत्त पिटकाचें हें सध्यांचें विद्रूप आणि ओंगळ रूप पाहून **ऱ्हिस् डेव्हिडस्** यांना आश्चर्याचा धक्का बसला. भगवंताच्या उदात्त शिकवणीचा ज्यांना साक्षात्कार झालेला आहे त्यालाहि पिटकाचें सध्यांचें हिडीस रूप पाहून आश्चर्याचा धक्का बसेल. या बाबतींत **ऱ्हिस् डेव्हिडस्** यानीं आपले विचार स्वतःच्या एका ग्रंथाच्या प्रस्तावनेंत [ Preface ( Xiii ) to the Kindred Sayings, Vol. II ] प्रदर्शित केलेले आहेत. त्या म्हणतात—

"सुत्त पिटकाच्या पानापानांत खरा गौतम दिसत नाहीं. याचें कारण काय असावें ? गौतमाच्या धम्माची माहिती देतांना त्याच्या अनुयायांनीं त्याचीं मूळ वचनें जशींच्या तशीं जनतेला सांगावीं लागलीं. ही प्रथा पुष्कळ वर्षें चालू होती. त्यानंतरच्या पुढील काळांतील उपदेशकांनीं बुद्धाचीं मूळ वचनें लोकांना सांगतांना, किंवा उपदेशितांना, अगर निवेदन करतांना, त्यांत गाळागाळ केली असावी; अथवा त्यांत पदरचें भरताड घुसडून दिलें असावें. मूळ वचनांचे संपूर्ण अर्थ न समजल्यामुळें त्या वचनांना मुरड घालून आपणांला हवे असलेले अर्थ तयार होतील अशीं कित्येक वचनें त्यांनीं मध्येंच घुसडून दिलीं असावींत. हे सर्व प्रकार कोणत्या प्रमाणांत झाले असतील, हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. मात्र हें खरें कीं, अनेक धम्मोपदेशकांनीं भगवंताच्या नंतरच्या हजारो वर्षांच्या काळांत असले प्रकार केलेले होते. कारण, हे धम्मोपदेशक आपले उपदेश तोंडीं सांगत होते. त्यांचे शिष्य ते उपदेश तोंडपाठ करीत होते. ते पाठ करतांनाहि कांहीं गाळागाळ आणि नवी भर त्या वचनांत पडली असावी. हे धम्मोपदेश लिहून ठेवले आणि त्यांच्या नकला अनेक वेळां करण्यांत आल्या. तेव्हां बदललेल्या वचनांत पुनः गाळागाळ आणि नवी भर पडत गेली असावी. भगवंताचीं मूळ वचनें कंठस्थ करून नंतर तीं इतरांना निवेदन करणारे उपदेशक, शिक्षक आणि तीं वचनें प्रथम लिहिणारे व त्यानंतर त्या लेखनबद्ध वचनांच्या नकला करणारे लेखक—

हे सर्व लोक इतर लोकांपेक्षां वेगळ्या भावनेनें आणि आदर्शानें आयुष्य व्यतीत करणारे होते. त्यांना जेव्हां जेव्हां एकाद्या वचनाबद्दल अगर अर्थाबद्दल शंका आली असेल तेव्हां तेव्हां त्यांनीं तीं वचनें बुद्ध देवाच्या अगर बुद्धाच्या शिष्यांच्या, किंवा या सर्वांच्या नंतरच्या काळांतील बौद्ध उपदेशकांच्या तोंडीं घातलीं असावींत. या वचनांचा अभ्यास करणारांनीं त्या वचनांचें सध्यांचें रौद्र रूप पाहून स्वतःला विचारावें कीं, ज्या प्रसिद्ध व्यक्तीच्या नांवाखालीं आतांपर्यंत हीं वचनें अधिकृत मानलीं गेलीं, हें कितपत खरें असावें ? सध्यांच्या रौद्र रूपाचें मूळचें सुंदर रूप कोणतें असावें ? याचाहि त्यांनीं शोध घ्यावा. त्यांनीं स्वतःला हेंहि विचारावें कीं, बावन कशी सोनें कोणतें असावें ?"

आनंद आणि भगवान बुद्ध यांचा महापरिनिब्बाण सुत्तपिटकांत जो स्त्रीविषयक संवाद दिलेला आहे तो नंतरच्या काळांतील भिक्कूंनीं घुसडून दिलेला मजकूर होय, असें जें मी वर सुचविलेलें आहे, तें अस्थानीं नाहीं. हें ऱ्हिस डेव्हिडस्च्या उद्गारांवरून स्पष्ट होतें. सुत्त पिटक हें भगवान बुद्धाच्या मृत्यूनंतर चारशें वर्षांनीं लिहिलें. हें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. तें लिहिण्यांत भिक्कू प्रमुख होते. संघांतील लोकांवर सत्ता गाजवून त्यांना एकत्र ठेवणें, हें भिक्कूच्या जीवनाचें मुख्य सूत्र होतें. त्यांनीं बुद्धाचीं जीं वचनें लिहून ठेवलीं तीं संघांतील लोकांना बंधनकारक व्हावींत, अशींच होतीं. या लेखनाचें कार्य करतांना भिक्कू लेखकांनीं संघांतील त्या वेळच्या परिस्थितीला धरून नवीं वचनें भगवान बुद्धाच्या नांवावर स्वतःच्या मेंदूतून निर्माण करून तीं सुत्त पिटकांत घुसडून दिलीं असावींत. कारण, संघांतील सर्व लोकांनीं कडक ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे, हें आचारतत्त्व भिक्कूंना संघाच्या दैनंदिन जीवनांत रुजवावयाचें होतें. तेव्हां आनंद आणि बुद्ध यांचा हा स्त्रीविषयक काल्पनिक संवाद सुत्तपिटकांत भिक्कूंनीं घुसडला असावा, असें समजण्यांत अतिशयोक्ति अगर अशक्यता वाटत नाहीं.

आनंद आणि बुद्ध यांचा काल्पनिक संवाद पिटकांत घुसडण्यांत आलेला असावा, हा मुद्दा आणखी दोन पुराव्यांवरून सिद्ध करतां येईल :—

(१) महापरिनिब्बाण सुत्ताच्या प्रस्तावनेंत एक तक्ता दिलेला आहे. (दीघ निकाय, भाग २, पा. ७२, सेक्रेड बुक्स ऑफ बुद्धिस्ट सर्व्हिस, डेव्हिडस् कृत). त्यावरून हें दिसून येतें कीं, या सुत्तांतील बरेच भाग इतर सुत्तांतहि आहेत. पण आनंद आणि बुद्ध यांचा स्त्रीविषयक संवाद कोणत्याहि इतर सुत्तांत असल्याचें आढळून येत नाहीं. हें विशेषतः महत्त्वाचें आहे.

(२) या प्रस्तावनेच्या २८ पानावर (सेक्रेड बुक्स ऑफ बुधिस्ट व्हिस, खंड ९, डेव्हिडस् कृत) असा उल्लेख आहे कीं, या सुत्ताची चिनी आवृत्ति अस्तित्वांत आहे. परंतु, सदर आवृत्तींत आनंद आणि बुद्ध यांच्या स्त्रीविषयक संवादाचा मुळींच मागमूस नाहीं.

हा संवाद घडला किंवा नाहीं, याबद्दल कोणती शक्यता आहे ? आनंदानें स्त्रीविषयक प्रश्न भगवंताला विचारले, याचें कारण काय असावें ? बुद्ध स्त्रियांशीं वागतांना जें वर्तन करत असे त्या वर्तनाशीं जुळणारे आनंदाचे प्रश्न होते काय ? आनंद असले प्रश्न भगवंताला विचारणें शक्यच नव्हतें. हें ठरविण्यास भरपूर पुरावा आहे. आणि, आनंदानें तसले प्रश्न विचारले असले तरी भगवंत त्या प्रश्नांना तसलीं (सुत्तांत दिलेलीं) उत्तरें देणें, हेंहि शक्य नाहीं. आनंद आणि बुद्ध यांचें स्त्रियांशीं जें वर्तन होत होतें त्याचे वृत्तांत पिटकांत दिलेले आहेत. त्या वर्तनाचें उदात्त आणि निर्मळ रूप आहे. तें पाहिल्यानंतर असें वाटतें कीं, आनंद असले प्रश्न कसे विचारूं शकला. ? आणि बुद्ध त्यांना असलीं उत्तरें कशीं देऊं शकला ? या परस्परविरोधी गोष्टींचा ताळमेळ कसा घालावा ?

असले प्रश्न भगवंताला विचारणें आनंदाला जरूर पडल्याची शक्यता नव्हती, हा मुद्दा सिद्ध करण्यास दुसरा एक पुरावा महापरिनिब्बाण सुत्ताच्या त्याच अध्यायांत आहे. आनंद आणि भगवंत यांचा स्त्रीविषयक संवाद ज्या गाथेंत दिलेला आहे त्या गाथेपासून थोड्या अंतरावर पुढें असलेल्या गाथेंत हा पुरावा सांपडतो. आनंद किती सुस्वभावी आणि सर्वांचा आवडता होता, यासंबंधीं भगवंत जें वर्णन करतात तें या पुढच्या दोन गाथेंत आलेलें आहे.

हें वर्णन हाच तो पुरावा होय. भगवंतानें वर्णन केलेला मजकूर बराच विस्तृत आहे. त्यांतील संबंधित भाग मी येथें देतों.

" १६. बंधूनों! अत्यंत सुंदर आणि मनोवेधक असे चार सद्गुण आनंदाच्या अंगांत आहेत. ते असेः—

बंधूनों! संघांतील भिक्कू बांधव आनंदाला जेव्हां भेटावयास येतात तेव्हां त्यांचीं अंतःकरणें त्याच्या दर्शनानें भारावून जातात. आणि, जेव्हां आनंद त्यांच्या पुढें सद्धर्मावर प्रवचनें करतो तेव्हां ते त्याच्या प्रवचनशैलीनें आनंदित होतात. आनंद जेव्हां कांहीं न बोलतां स्वस्थ बसतो तेव्हां, बंधूनों! त्याला भेटावयास आलेले भिक्कू दुःखानें व्याकुळ होऊन त्याच्यापुढें स्वस्थ बसतात.

बंधूनों! जेव्हां संघांतील भिक्कुणी, अगर धार्मिक प्रवृत्तीचे संसारी पुरुष अथवा स्त्रिया त्याला भेटावयास येतात, आणि आनंद त्यांच्या पुढें सद्धर्मावर प्रवचनें करूं लागतो, तेव्हां ते त्याच्या प्रवचनशैलीनें आनंदित होतात. आनंद जेव्हां कांहीं न बोलतां स्वस्थ बसतो, तेव्हां, बंधूनों! त्याला भेटावयास आलेल्या भिक्कुणी दुःखानें व्याकुळ होऊन त्याच्यापुढें स्वस्थ बसतात."

भगवंताच्या या उद्गारांवरून हें स्पष्ट होतें कीं, संघांतील भिक्कुणी आणि आसपासच्या प्रदेशांतील धार्मिक प्रवृत्तीच्या घरंदाज आणि संसारी स्त्रिया आनंदाला भेटण्यासाठीं सदोदित येत होत्या. तो त्यांची भेट घेत असे. तो त्यांच्याशीं धार्मिक प्रश्नांवर चर्चा करीत असे. असें असतां, आनंदानें भगवंताला स्त्रीविषयक प्रश्न विचारलें, असें मानणें अप्रयोजक ठरतें. स्त्रिया आनंदाला भेटावयास येतात, हें भगवंताला माहीत होतें. स्त्रियांनीं आनंदाला भेटूं नये, असा भगवंतानें कधींहि विरोध केला नाहीं. भिक्कू आणि भिक्कुणी यांचें जेवण संघांत एका पंक्तींत होत असे. भगवंतानें ही प्रथा सुरू केलेली होती. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतली तर, स्त्रियांशीं संपर्क नको, असें भगवंतानें धोरण स्वीकारलें होतें, असें मानणें हें चूक ठरतें. सारांश, आनंद आणि भगवंत यांचा महापरिनिब्बाण सुत्तांतील स्त्रीविषयक संवाद हा अधिक्षेपित भाग होय, हें स्पष्ट होतें.

आणखी एक दुसरा पुरावा आनंदाच्या आयुष्यांतील घटनेवरून दिसून येतो. ती घटना सुत्तांत वर्णिलेल्या स्त्रीविषयक संवादाच्या सर्वस्वीं विरुद्ध आहे. पहिल्या संगितींत आनंदाच्या विरुद्ध पांच आरोप करण्यांत आले होते, हें सर्वश्रुत आहे. ते म्हणजे—

( १ ) भगवंताच्या मतानें विनयांतील कोणते भाग जास्त महत्त्वाचे आणि कोणते कमी महत्त्वाचे आहेत; आणि कमी महत्त्वाच्या भागांत कमी अधिक फेरफार करण्याचा अधिकार भगवंतानें संघाला दिलेला होता किंवा नाहीं, याबद्दल आनंदानें भगवंताला विचारलें नाहीं.

( २ ) भगवंताची कफनी शिवत असतां आनंदानें तिला पाय लावले.

( ३ ) भगवंताच्या मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिव देहाला पुरुषांच्या अगोदर स्त्रियांनीं स्पर्श करून वंदन करावें, अशी आनंदानें स्त्रियांना मुभा दिली. स्त्रियांनीं वंदन करतांना आपल्या अश्रूंनीं भगवंताच्या पार्थिव देहाला ओंगळ करून टाकलें.

( ४ ) भगवंतानीं आणखी एक कल्प जिवंत रहावें, अशी आनंदानें भगवंताला विनंति केली नाहीं.

( ५ ) स्त्रियांना संघांत प्रवेश मिळवून देण्यास आनंद प्रामुख्यानें कारणीभूत झाला.

आनंदानें हे सर्व आरोप मान्य केले. मी अपराधी आहें किंवा नाहीं, असें तो म्हणाला नाहीं, हा मुद्दा निराळा आहे. पण तो महत्त्वाचा नाहीं. आपल्या विवेचनाला तिसरा आरोप फार महत्त्वाचा आणि उपयुक्त आहे. महापरिनिब्बाण सुत्तांत जो स्त्रीविषयक सल्ला भगवंतानें आनंदाला दिला तो जर खरा मानला तर भगवंताच्या पार्थिव देहाला पुरुषांच्या अगोदर वंदन करण्याची परवानगी आनंदानें स्त्रियांना दिली, हें कसें ? आनंद भगवंताच्या पूर्वीच्या स्त्रीविषयक सल्ल्याला इतक्या उद्दामपणानें आणि जाणून-बुजून दूर सारून वागला, असें म्हणणें रास्त होईल काय ? नाहीं. यावरून काय सिद्ध होतें ? सुत्तांत वर्णन केलेला स्त्रीविषयक सल्ला भगवंतानें आनंदाला दिलेला नव्हता,

हेंच! तो दिलेला होता असें मानलें तर आनंद त्याच्या विरुद्ध वर्तन करील, असें समजणें चूक होईल. भगवंतानें असला सल्ला आनंदाला दिलेला नव्हता, असें मानणें, हेंच तर्कसिद्ध सत्य होय!!

आतां, आपण बुद्धाच्या दृष्टिकोनांतून या मुद्दयाचा विचार करूं या. बुद्धानें आनंदाच्या प्रश्नांना जीं उत्तरें दिलीं तीं त्याच्या एकंदर शिकवणुकीला आणि जीवनाला शोभून दिसतील, अशीं होतीं काय? स्त्रियांशीं वागतांना भगवंत ज्या पद्धतीनें वर्तन करीत होते त्या पद्धतीवरून या प्रश्नांचें उत्तर मिळतें. बुद्धानें आनंदाला सल्ला दिला कीं स्त्रियांशीं संपर्क ठेवूं नका. पण स्वतः भगवंतानें स्त्रियांचा संपर्क टाळला होता काय? या बाबतींत भगवंताच्या आयुष्यांतील सत्य घटना काय प्रकाश टाकतात?

भगवंताच्या आयुष्यांतील दोन घटना चटकन माझ्या पुढें उभ्या रहातात. पहिली विशाखाची. विशाखा ही भगवंताच्या प्रमुख ऐंशीं स्त्रीशिष्यांपैकीं एक होती. ती त्यांच्यांत सर्व श्रेष्ठ होती. तिच्या कर्तृत्वामुळें 'दानदात्यांची प्रमुख' अशी तिला पदवी देण्यांत आलेली होती. भगवंताचें प्रवचन ऐकण्यासाठीं विशाखा एकदां गेली. तें प्रवचन ऐकून तिनें बुद्धाचें शिष्यत्व नम्रतेनें स्वीकारलें. ती संघांत राहूं लागली. स्त्रियांशीं वर्तन कसें करावें, यासंबंधीं बुद्धानें आनंदाला जें सांगितलें तसलें वर्तन बुद्धानें विशाखेशीं केलें काय? बुद्धाचें प्रवचन ऐकण्यास विशाखा आली तेव्हां, आणि ती संघांत राहूं लागली तेव्हां, बुद्धाच्या भिक्कू शिष्यांनीं त्याबद्दल नापसंती दाखविली काय? ते भिक्कू तेथून लांब कोठें तरी रागानें निघून गेले काय?

दुसरी घटना वैशालीच्या आम्रपल्लीची. भगवंत वैशालीला आले तेव्हां ती त्यांचें दर्शन घेण्यास गेली. त्याच वेळीं लिच्छवी हे तेथें दर्शनास आलेले होते. आम्रपल्लीनें भगवंत आणि भिक्कू यांना आपल्या घरीं जेवण्यास येण्याचें नम्रतेनें आमंत्रण दिलें. ती राजदरबारांत गायन व नृत्य करणारी कलावंतीण होती. वैशाली नगरींतील सर्व स्त्रियांत ती सौंदर्यानें श्रेष्ठ होती. लिच्छवींनींहि भगवंताला जेवण्यास येण्याचें आमंत्रण दिलें. हे लिच्छवी थोर, श्रीमंत आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १३६८९० वि: निबंध


राजकुळांतले होते. त्यांचें आमंत्रण नाकारून बुद्धानें आम्रपलीचें आमंत्रण स्वीकारलें. बुद्धानें आपला अपमान केला, असें समजून लिच्छवी तेथून रागारागानें निघून गेले. बुद्ध आणि भिक्कू यांनीं आम्रपलीच्या घरीं जाऊन यथेच्छ भोजन केलें. लिच्छवी हे थोर कुळांतले. आम्रपल्ली ही हीन कुळांतली. लिच्छवींच्या आमंत्रणाला नकार देऊन आम्रपलीच्या आमंत्रण स्वीकारून बुद्धानें तिचा गौरव केला. तो कोणत्या हेतूनें ? हीन कूळ अगर स्त्री हे भेद बुद्ध मानीत नव्हता, हें यावरून सिद्ध होतें.

याशिवाय आणखी दुसरीं उदाहरणें आहेत. नंदकोवद सुत्त ( मज्जिम निकाय, २, पा. ३०९ ) यांत पज्जुनची मुलगी कोकनद हिची कथा आहे. वैशाली येथील महावनांत बुद्धाचा मुक्काम असतांना ती मध्यरात्र उलटल्यानंतर बुद्धाचें दर्शन घ्यावयास आली. रात्रीचें स्निग्ध वातावरण आणि त्यांत कोकनदाचें उमललेलें सौंदर्य ! यामुळें कोण मोहित होणार नाहीं ? ( खंड १, पा. ४० ).

राजा पसेनजित याची पत्नी मल्लिका ही बुद्धाचीं प्रवचनें ऐकण्यास वेळोवेळीं येत असे. याबद्दलचे उल्लेख पिटकांत जागोजागीं आढळून येतात.

या उदाहरणांवरून हें स्पष्ट होतें कीं बुद्ध स्त्रीसंपर्क वर्ज्य समजत नव्हता. स्त्रियाही बुद्धाच्या सान्निध्यांत जाण्यास व राहण्यास अनमान करीत नसत. तेव्हां त्यांच्या मनांत शंका कुशंका लवमात्रहि उत्पन्न होत नव्हत्या.

स्त्रियांशीं वेळोवेळीं संपर्क आला तर पुरुषांचें मन अस्थिर होतें. असले पुरुष मग नैतिक अधःपाताच्या मार्गाला लागतात. याबद्दलची बुद्धाला जाणीव होती. म्हणूनच त्यानें भिक्कूंना एकदां सांगितलें होतें कीं, गृहस्थाश्रमी उपासकांच्या घरीं वेळोवेळीं जाण्याचें टाळा. ( अंगुत्तर निकाय, ३, पा. १९० ). पण, तुम्हीं गृहस्थाश्रमी उपासकांच्या घरीं कधींहि जाऊं नका, असें बुद्धानें भिक्कूंना कधींहि सांगितलें नव्हतें. त्यानें भिक्कूसमोर स्त्रियांसंबंधीं तिरस्कारयुक्त शब्द कधींहि उच्चारलेले नव्हते. स्त्रियांच्या संगतीच्या मोहापासून तुम्ही दूर रहा, एवढेंच बुद्धाचें भिक्कूंना सांगणें होतें.

एवढो सावधपणा पाळण्याचें कारण हें, कीं, बुद्ध कडक ब्रह्मचर्याचा चाहता होता. ब्रह्मचर्याचा खरा वैरी कोण, याची तीव्र जाणीव बुद्धाला होती. यासंबंधीं त्यानें एकदां उद्गार काढले होते कीं, "स्त्री ब्रह्मचाऱ्याचें जीवन कलंकित करूं शकते." (संयुत्त निकाय, १, पा. ५३). स्त्रियांसंबंधीं त्याचें असें मत असतांहि बुद्धानें भिक्कूंना कधीं सांगितलें कां कीं, तुम्ही स्त्रियांचा संपर्क अजिवात टाळा? कधींहि नाहीं. हें बंधन त्यानें भिक्कूंवर कधींहि लादलें नव्हतें. उलट अशीं, बुद्धानें भिक्कूंना स्त्रियांशीं संपर्क ठेवण्याबद्दल अनुमति दिलेली होती. त्या संपर्कांत सावधानता बाळगावी, एवढाच त्याचा भिक्कूंना नेहमीं उपदेश होत होता. "जेव्हां जेव्हां तुम्हांला स्त्रियांच्या सहवासांत थोडा वेळ रहाण्याची पाळी येईल तेव्हां तेव्हां तुम्ही आपली माता, बहीण व मुलगी यांच्या संबंधांत जी तुमच्या मनांत नैसर्गिक सद्भावना निर्माण होत असते ती सद्भावना त्या त्या वेळीं तुम्ही मनांत निर्माण करा!" बुद्धाच्या या उपदेशाचें मर्म हें कीं, वृद्ध स्त्रीला माता, तरुणीला भगिनी, आणि किशोरीला मुलगी मानून त्यांच्यांशीं शुद्ध भावनेनें भिक्कूंनीं वागावें. (Kindred Sayings, IV, P. 68.)

स्त्रियांनीं संघांत येऊं नये, असें बुद्धाचें प्रथम मत होतें. तें मत बदलून त्यानें स्त्रियांना संघांत येऊं दिलें. पण त्यानें स्त्रियांचा निराळा संघ निर्माण केला. तो भिक्कुणीसंघ भिक्कुसंघाच्या आज्ञेंत राहिला पाहिजे, यासंबंधींचे नियम बुद्धानें तयार केले. या सर्व घटनांकडे बोट दाखवून टीकाकार म्हणतील कीं, बुद्धाचें स्त्रियांसंबंधींचें मत चांगलें नव्हतें. या घटनांचा थोडा जास्त विचार करणें जरूर आहे. महाप्रजापती परिव्रजा घेण्यास बुद्धाकडे आली तेव्हां त्यानें तिला विरोध कां केला? स्त्रिया जात्याच चंचल वृत्तीच्या असतात. त्या आपल्या संघांत आल्या तर आपल्या संघाचें समजांतील स्थान कमी दर्जाचें होईल, आपला संघ समाजाला आदरणीय वाटणार नाहीं, असें कां बुद्धाला वाटलें? किंवा, स्त्रिया या बौद्धिक आणि नैतिक दृष्टीनें आपल्या धर्मांतील आणि संघांतील सर्व पवित्र तत्त्वें जाणून घेण्यास व त्याप्रमाणें वर्तन करण्यास असमर्थ आहेत, असें कां बुद्धाला वाटलें? म्हणून त्यानें महाप्रजा-

दा. क्र. ११५८

पतीच्या परिव्रजेला विरोध केला कीं काय ? वरील दोनपैकीं दुसरा प्रश्न एकदां आनंदानें बुद्धाला विचारला होता, तो बुद्धाचा संघांत स्त्रीप्रवेशाला विरोध पाहून. त्या वेळीं आनंदाच्या सर्व शंकांचें निरसन बुद्धानें केलेलें होतें. तेव्हां बुद्ध म्हणाला होता कीं, स्त्रिया आपला धम्म आणि आपली धम्मशिक्षा जाणण्यास व त्याप्रमाणें वागण्यास सर्वस्वीं समर्थ आहेत. पण या कारणामुळें बुद्धाचा स्त्रियांना विरोध नव्हता. स्त्री बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता या बाबतींत पुरुषापेक्षां कमी दर्जाची आहे असें बुद्ध समजत नव्हता. स्त्रिया चंचल वृत्तीच्या आहेत, असें बुद्ध समजत होता, आणि संघांत स्त्रियांना प्रवेश करूं दिला तर संघाची समाजांतील पत नाहींशी होईल, अशी बुद्धाला भीति वाटत होती. अशा प्रकारचें मत ज्या टीकाकारांचें आहे तें कवडीमोल किंमतीचें आहे. कारण, बुद्धाचें स्त्रियांबद्दल जर तसें मत असतें तर त्यानें स्त्रियांना संघांत कधींहि घेतलें नसतें.

भिक्कुणीसंघ भिक्कुसंघाच्या खालच्या दर्जाचा ठरविण्यांत बुद्धाची स्त्री-विषयक दृष्टि कलुषित होती, असें जे टीकाकार म्हणतात त्यांना उत्तर हें:—स्त्री आणि पुरुष यांच्यांतील नैसर्गिक शारीरिक श्रेष्ठपणा आणि कनिष्टपणा या गोष्टी लक्षांत घेऊनच बुद्धानें ही दोन संघांची योजना केली नव्हती. ती योजना करण्यांत त्याचा केवळ व्यवहारी दृष्टिकोन होता. स्त्रियांना संघांत घेण्याचा प्रश्न जेव्हां निघाला तेव्हां बुद्धाच्या पुढें दोन प्रश्न उत्पन्न झाले. स्त्रिया आणि पुरुष यांच्यासाठीं संघ एक असावा कीं दोन वेगवेगळे संघ असावेत ? पुष्कळ विचार केल्यानंतर त्यानें ठरविलें कीं, दोन वेगवेगळे संघ असावेत. परिव्रजा घेतल्यानंतर ब्रह्मचर्यावस्थेंत राहणें, याबद्दल भिक्कू आणि भिक्कुणी शपथबद्ध झालेले होते. परंतु ते एकत्र राहिले तर ही शपथबद्धता त्यांना अभंग ठेवणें शक्य नव्हतें. म्हणून भिक्कू आणि भिक्कुणी यांचे संघ वेगवेगळे ठेवणें इष्ट होय, असें बुद्धानें ठरविलें, तें व्यवहारी दृष्टि ठेवूनच ठर-विलें. स्त्रियांना कमी लेखण्याची त्याची मुळींच दृष्टि नव्हती. भिक्कूणीसाठीं स्वतंत्र संघ निर्माण करण्याच्या वेळीं बुद्धाला प्रश्न पडला कीं, हे दोन्ही संघ समसमान पातळीवर ठेवून त्यांत स्त्रीपुरुषांना निःशंक आणि निर्भय मनानें

मिसळतां येईल, अशी योजना करावी, कीं दोन्ही संघ परस्परांपासून अगदीं अलग ठेवावेत ?

भिक्कुणीसंघ भिक्कुसंघापासून वेगळा ठेवणें इष्ट आहे, हा निर्णय बुद्धानें घेतलेला होताच. भिक्कू आणि भिक्कुणी यांना कडक ब्रह्मचर्याचें व्रत पाळावयाचें होतें, म्हणून हा निर्णय तें व्रत पाळण्यास सहाय्यक ठरत होता. स्त्री आणि पुरुष यांच्या आयुष्यांत वैषयिक वासनेला फार मोठें महत्त्व आहे. याची बुद्धाला जाणीव होती. ही वासना स्त्रीला पुरुषाची दासी करते, आणि पुरुषाला स्त्रीचा दास बनवते. अशा अर्थाचे उद्गार बुद्धानें एकदां काढले होते. ही वासना अनियंत्रित स्वरूपांत राहिली तर ती ब्रह्मचर्यावस्थेला खतम् करील. या वासनेला भिक्कू आणि भिक्कुणी वळी न पडतील, अशी व्यवहारी योजना बुद्धानें केली ती स्त्री आणि पुरुष यांच्यासाठीं वेगवेगळे संघ निर्माण करून !

स्त्री आणि पुरुष यांच्यासाठीं वेगवेगळे संघ बुद्धानें काढले. या व्यतिरिक्त त्याला दुसरा निर्णय घेतां आला असता कां ? ज्या स्त्रिया संघांत आल्या त्या व्यवहारांत न पडलेल्या अशा किशोरावस्थेंतील होत्या. धम्मांतील तत्त्वें आणि आचरणाचे नियम यांबद्दल त्यांना उपदेश देऊन तयार करावयाचें होतें. हें काम कोणीं करावें ? संघांतील भिक्कूंशिवाय हें काम करण्यास दुसरे कोण योग्य होते ? भिक्कू धम्म आणि आचरणाचे नियम हे पाळण्यांत तरबेज झालेले होते. म्हणूनच बुद्धानें हें काम भिक्कूंना दिलें. पण हें काम त्यांना देतांना बुद्धानें कोणती सावधानता स्वीकारली ? भिक्कू भिक्कूणींना शिक्षण देत असतां त्यांचे परस्परांशीं संबंध कसे राहिले पाहिजेत, याची दक्षता बुद्धानें घेतली. या प्रश्नांचें उत्तर मिळालें म्हणजे भिक्कूणीसंघ भिक्कूसंघाच्या खालच्या दर्जाला बुद्धानें कां ठेवला याचा उलगडा होतो. भिक्कूंनीं भिक्कूणींना शिकवितांना गुरुशिष्यांचे पवित्र संबंध राखले पाहिजेत, असा बुद्धानें नियम केला. भिक्कू हे शिक्षक आणि भिक्कूणी या त्यांच्या शिष्या. शिक्षक म्हणून भिक्कूचा दर्जा भिक्कूणीपेक्षां ज्यास्त महत्त्वाचा होता. शिष्या म्हणून भिक्कूणींचा दर्जा भिक्कूपेक्षां कमी होता—आज्ञाधारकपणाचा होता. भिक्कूसंघ हा भिक्कूणीसंघावर

शिक्षकाप्रमाणें अधिकार गाजवीत होता. तो अधिकाऱ्याप्रमाणें सत्ता गाजवीत नव्हता. भिक्कुणीसंघ भिक्कुसंघाच्या आज्ञेंत ठेवण्यांत बुद्धानें काय चूक केली? शिष्येनें शिक्षकाच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे, हा नियम चुकीचा ठरतो काय?

या बाबतींत ख्रिस्ती धर्मांतील जोगिणीसंघ आणि जोगीसंघ यांच्या व्यवस्थेकडे पाहिलें तर आपणाला तारतम्य दृष्टीनें बरीच उपयुक्त माहिती मिळेल. जोगिणीसंघाचा दर्जा जोगीसंघाच्या खालीं आहे, हें खरें ना? होय. (कॅथोलिक इनसायक्लोपिडियांतील "जोगिणी" हा लेख पहा. खंड ११ वा, पा. १६४). यावरून ख्रिस्ती धर्म स्त्रियांना पुरुषापेक्षां हीन लेखतो, असें कोणी म्हणूं शकेल काय? भिक्कू आणि भिक्कुणी यांच्यामधील संबंध नियमबद्ध करण्यासाठीं बुद्धानें जी योजना आंखली ती स्त्रियांना कमी दर्जा देणारी होती, असा निराळा अर्थ कोणीहि झालें तरी कां लावावा? असा अर्थ लावणें हें तर्कशुद्ध आहे काय?

बुद्धाचें स्त्रियासंबंधींचे ग्रह दूषित होते, म्हणूनच तो भिक्कूंना एकसारखा उपदेश करीत असे कीं, तुम्हीं स्त्रियांपासून सावध रहा, असा जो मुद्दा कोणी उपस्थित करतात त्याला सुत्त पिटकांत कोठेंहि आधार मिळत नाहीं.

— २ —

वर जीं वैयक्तिक उदाहरणें सांगितलीं तीं बाजूला सारून आपण बुद्धाची स्त्रियांसंबंधीं सर्वसाधारणपणें कोणती भूमिका होती, हें पाहूं या. बुद्धानें स्त्रियांना हीन लेखलें होतें काय? बौद्ध धर्माचे जे पवित्र ग्रंथ आहेत त्यांत बुद्धानें स्त्रियांबद्दल वेळोवेळीं उद्गार काढलेले आढळून येतात. ते उद्गार ज्यांनीं लक्षपूर्वक वाचलेले असतील त्यांना हें दिसून येईल कीं, बुद्धानें स्त्रियांना हीन लेखण्याऐवजीं त्यांच्याबद्दल गौरवास्पद उद्गार काढून त्यांना समाजांत उच्च दर्जा दिलेला आहे.

आपल्या कुलांत मुलगी जन्माला येणें, ही घटना फार प्राचीन कालापासून हिंदी समाजांत सर्वसाधारणपणें वाईट मानली जात आहे. पण या घटनेबद्दल

बुद्धाची काय प्रतिक्रिया होती ? पूर्वपरंपरेनें चालत आलेल्या या घटनेविरुद्ध बुद्धाचें मत होतें. बुद्धानें राजा प्रसेनजित याला जो सल्ला दिला होता, त्यावरून हें सिद्ध होतें. श्रावस्ती येथील जेतवनांत बुद्धाचा मुक्काम असतां एकदां राजा प्रसेनजित त्याच्या दर्शनासाठीं आला होता. बुद्ध आणि राजा बोलत बसले असतां तेथें राजवाड्यांतून राजदूत बातमी घेऊन आला कीं, राणी मल्लिका प्रसूत झाली. तिला मुलगी झाली. ती बातमी ऐकून राजाचा चेहरा गोरामोरा झाला. राजाला दुःखी पाहून बुद्धानें त्याला दुःखी होण्याचें कारण विचारलें. आपल्याला मुलगी झाली म्हणून आपणाला दुःख झालें, असें राजानें बुद्धाला सांगितलें. तेव्हां बुद्ध म्हणाला, "मानवेंद्रा ! यांत दुःख मानण्याचें काय कारण ? मुलगी मुलग्यापेक्षां ज्यास्त प्रभावी अपत्य म्हणून ठरूं शकेल. ती मोठी शहाणी आणि सद्गुणी होईल...... ती अशा मुलग्याला जन्म देईल कीं, तो मोठा कर्तृत्ववान होईल, आणि विस्तीर्ण प्रदेशाचा राजा होईल......" (संयुत्त निकाय, खंड १, पा. ११० )

कांहीं कुटुंबें भरभराटीस येतात आणि कांहीं विलयास जातात, असें कां होतें ? असा एकदां भिक्कूंनीं बुद्धाला प्रश्न विचारला. तेव्हां त्यानें त्यांना सांगितलें—

"मुनीनों ! जीं कुटुंबें सर्व संपत्तींनीं सधन होऊन महत्पदास चढतात तीं लौकर नष्ट होतात. याचें कारण हें कीं, त्यांचें जें मोठेपण नष्ट झालेलें असतें तें पुनः प्रस्थापित करण्याचा तीं मनापासून प्रयत्न करीत नाहींत. त्यांचें वैभव विलयाला गेलेलें असतें तें पुनः मिळविण्यासाठीं तीं झगडत नाहींत. तीं प्रमाणाबाहेर खातपीत असतात. जो मनुष्य अगर जी स्त्री नीतिभ्रष्ट आहे, अशांच्या हातांत तीं कारभार देतात. जीं कुटुंबें लौकर अधोगतीला जातात त्यांच्या अधोगतीचीं हीं चार कारणें, किंवा त्यांपैकीं एक, अगर दुसरें कारण, हीं जबाबदार होत.

मुनीनों ! कांहीं कुटुंबें पुष्कळ काळ टिकतात. याचें कारण हें कीं, त्यांचें जें वैभव नष्ट झालेलें असतें तें पुनः मिळविण्यासाठीं तीं मनापासून धडपड

करीत असतात. त्यांचा जो नाश झालेला असतो तो भरून काढण्यासाठीं तीं एकसारखा प्रयत्न करीत असतात. तीं खाणेंपिणें योग्य प्रमाणांत करतात. आणि नीतिमान स्त्री अगर पुरुष यांच्या हातांत तीं कारभाराचीं सूत्रें देतात. जीं कुटुंबें पुष्कळ काळ टिकतात याला हीं चार कारणें, अगर त्यांपैकीं एक, किंवा दुसरें कारण, हीं जबाबदार होत." (अंगुत्तर निकाय, खंड २, पा. २५४–५५).

"या जगांत चक्रवर्ती राजा जेव्हां अस्तित्वांत येतो तेव्हां काय होतें?" असा एकदां भिक्कूंनीं बुद्धाला प्रश्न विचारला होता. तेव्हां बुद्धानें त्यांना उत्तर दिलें:—

"जेव्हां असा सम्राट् अस्तित्वांत येतो तेव्हां सात भांडारें अस्तित्वांत येतात. रथ, हत्ती, घोडे, रत्नें, स्त्रिया, कुटुंबाचा शास्ता पिता आणि गादीचा वारसदार राजपुत्र, हीं तीं भांडारें होत." (अंगुत्तर निकाय, खंड ५, पा. ८३).

स्त्री ही जगाला किती मौल्यवान देणगी आहे, याबद्दल एकदां प्रवचनांत विवेचन करतांना बुद्धानें उद्गार काढले कीं, "स्त्री ही सर्वोत्कृष्ट देणगी आहे. कारण तिची उपयुक्तता अमोल आहे. तिच्यापासून बोधिसत्त्व आणि चक्रवर्ती हे जन्म घेतात." (संयुत्त निकाय, खंड १, पा. ६२)

कुटुंबांत मुलगी जन्मली तर त्या कुटुंबानें दुःख न मानतां आनंद मानावा, ज्या कुटुंबाचा कारभार स्त्रीच्या हातांत देतात तीं कुटुंबें विनाशापासून मुक्त होतात, स्त्री हीं सात भांडारांपैकीं एक अत्यंत मौल्यवान भांडार आहे, अशीं ज्या बुद्धाचीं मतें होतीं, तो स्त्रीद्वेष्टा आणि स्त्रियांना दूरवर ठेवणारा होता, असें समजणें, हें तर्कशुद्ध आहे काय? स्त्रीवर्गासंबंधीं बुद्धाच्या ज्या वैशिष्ट्यपूर्ण भावना होत्या त्या वर दिलेल्या त्याच्या वचनांतून दृग्गोचर झालेल्या आहेत. त्या भावना लक्षांत घेतां, बुद्ध हा स्त्रीजातीचा तिरस्कार व धिक्कार करीत होता, असें कोणी सूज्ञ माणूस म्हणूं शकेल काय?

— ३ —

भिक्कूंच्या आधिपत्याखालीं भिक्कूणींना बुद्धानें ठेवलें, त्यानें यामुळें एक मोठा सामाजिक गुन्हा केला, असें जे मानतात त्यांना बुद्धानें स्त्रीवर्गाला संन्यासदीक्षा

घेण्याची सुभा दिली, हें त्याचें समाजक्रांतिकारक कृत्य होय, याची जागीव झालेली नसावी. त्या काळांत ब्राह्मणी धर्म स्त्रियांना ज्ञानार्जन करण्यास सुभा देत नव्हता. स्त्रियांनीं संन्यास घ्यावा कां, हा प्रश्न त्या काळीं उत्पन्न झाला, तेव्हां ब्राह्मणी धर्मानें स्त्रीवर्गावर एक मोठा दुसरा अन्याय केला. ब्राह्मण हे वेदांची पूजा करीत असत. त्यांना संन्यास हा आदर्शमय वाटत नव्हता. उपनिषदें हीं पवित्र धार्मिक ग्रंथ होत असें ब्राह्मणांनीं पुष्कळ काळपर्यंत मान्य केलें नव्हतें. ही ऐतिहासिक घटना आहे. तर्कट नव्हें. उपनिषदें संन्यासाला आदर्श समजत होतीं. आत्मा हा ब्रह्म होय, ही उपनिषदांतील प्रमुख शिकवण होय. ती शिकवण आत्मसात करणें, हें संन्यास वृत्तीचें ध्येय होतें. पण ब्राह्मण लोक संन्याशी जीवनाचे कट्टर विरोधक होते. संन्यास वृत्तीबद्दल जे कडाक्याचे वादविवाद झाले त्यांत शेवटीं ब्राह्मणांनीं संन्यास वृत्तीला मान्यता दिली. ती मान्यता कांहीं अटींवर होती. त्यांपैकीं एक अट अशी होती कीं, स्त्रिया आणि शूद्र यांना संन्यास वृत्तीचा अधिकार नसावा.

स्त्रियांना संन्यास वृत्तीचा अधिकार नसावा, अशी अट ब्राह्मणांनीं घातली. याचें कारण काय, हें समजावून घेतलें म्हणजे बुद्ध आणि ब्राह्मण यांचीं स्त्रियांसंबंधीं जीं मतें होतीं त्यांच्यांतील दक्षिणोत्तर फरक लक्षांत येईल. हें कारण मनूनें सांगितलेलें आहे. ते असें:—

"९–१८. स्त्रियांना वेद शिकण्याचा अधिकार नाहीं. म्हणून त्यांचे संस्कार वैदिक मंत्रांशिवाय करावयाचे असतात. स्त्रियांना धर्माचें ज्ञान नसे. कारण त्यांना वेद शिकण्याचा अधिकार नव्हता. वैदिक मंत्र उच्चारले तर पाप नष्ट होतें. ज्या अर्थीं स्त्रिया वैदिक मंत्र उच्चारूं शकत नाहींत त्या अर्थीं त्या असत्य (पापमय) स्थितींत रहाणाऱ्या होत."

मनु बुद्धानंतर झाला. परंतु त्यानें जें वरील मत व्यक्त केलें तें त्याच्या पूर्वी अस्तित्वांत असलेल्या ब्राह्मणी धर्मग्रंथांतील विचारसरणीला धरून, हें उघड आहे. हें मत भारतांतील स्त्रीवर्गाचा उपमर्द आणि विनाश करणारें होतें. विनाश म्हणण्याचें कारण हें कीं, ज्ञानार्जन करणें हा प्रत्येक मानवाचा जन्म-

सिद्ध हक्क आहे, आणि तो हक्क कांहीं सयुक्तिक कारण न देतां ब्राह्मणांनीं स्त्रियांपासून हिरावून घेतला. उपमर्द म्हणण्याचें कारण हें कीं, ज्ञानार्जनाचा हक्क स्त्रीपासून हिरावून घेतल्यानंतर ब्राह्मणांनीं तिला ज्ञानरहित, अशुद्ध, असत्यामंगळ, अशी मानली. संन्यास हा ब्रह्मप्राप्तीचा मार्ग होय. पण स्त्री अमंगळ असल्यामुळें ती संन्यास घेण्यास पात्र नाहीं, अशी ब्राह्मणी विचारसरणी होती. ब्राह्मणांच्या या कृत्यामुळें स्त्री ही आध्यात्मिक ज्ञानार्जनाच्या हक्काला मुकली. एवढेंच नव्हे तर, तिच्या जीवनांत आध्यात्मिक शक्तीचें बीज रुजूंच शकत नाहीं, असें मानण्यांत आलें.

स्त्रियांच्या बाबतींत ब्राह्मणांनीं हें केवढें क्रूर कृत्य केलें? त्याला जगांत जोड नाहीं. प्रो० मॅक्स म्युल्लर यांनीं एकदां म्हटलेलें आहे (Hibbert Lectures on Religion, p. 379) कीं, "पुरुष आध्यात्मिक ज्ञानापासून कितीहि दूर असला तरी त्याच्याइतका ईश्वराच्या अगदीं जवळ राहणारा कोणताही प्राणी या पृथ्वीतलावर नाहीं. त्याच्याइतका ईश्वरमय झालेला दुसरा प्राणी या जगांत सांपडणार नाहीं." पुरुषाच्या बाबतींत हें जर सत्य मानावयाचें तर स्त्रीच्या बाबतींत तें कां मानूं नये? याचें उत्तर ब्राह्मणांच्याजवळ नाहीं. परिव्रजेची दीक्षा घेण्याचा हक्क बुद्धानें स्त्रियांना देऊन त्यांच्यावरील होत आलेले दोन प्रकारचे अन्याय एका फटकाऱ्यानें दूर केले. ते दोन प्रकारचे अन्याय म्हणजे, पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनीं ज्ञानार्जन करणें, आणि आपल्यांत असलेलें सुप्तावस्थेंतील आध्यात्मिक तेज याची ओळख करून घेणें, हे होत. बुद्धानें हे दोन्ही हक्क स्त्रियांना दिले. या कृतीनें बुद्धानें भारतांतील स्त्रियांना गुलामगिरींतून मुक्त केलें. त्यांच्या जीवनांत क्रांति घडवून आणली. या बाबतींत प्रो. मॅक्स म्युल्लर यांचे उद्गार (Ibid, p. 273) मोठे सूचक आहेत:—

"भारताचा इतिहास आपणांस हें सांगतो कीं, प्राचीन काळांत ब्राह्मणी धर्मानें बंधनांची जी गुलामगिरीची जालीम सांखळी निर्माण केलेली होती ती बौद्ध धर्मानें खिळखिळी केली, आणि शेवटीं ती ताडकन् तोडली. हें कसें झालें? वैयक्तिक स्वातंत्र्य, सामाजिक विषमतेच्या कर्दमांतून बाहेर पडण्याची पददलित मानवांची प्रबळ इच्छा, आध्यात्मिक ज्ञानार्जनासाठीं वनांत जाऊन

रहाण्याची इच्छा उत्पन्न होतांच कोणालाहि वनांत जाण्याचें स्वातंत्र्य असणें, आणि वनांत जाऊन निर्बंधपणें ज्ञानार्जन करणें, याबद्दलचे जे नैसर्गिक मानवी हक्क होते त्यांना बौद्ध धर्मानें पाठिंबा दिला. ते हक्क समाजांत प्रस्थापित केले. बौद्ध धर्माचें हें महान् ऐतिहासिक कार्य आपणांला नाकारतां येणार नाहीं."

बुद्धानें भारतांतील स्त्रियांना हें जें स्वातंत्र्य दिलें त्याचें महत्त्वमापन करतां येत नाहीं. भिक्कुणी संघ भिक्कू संघाच्या स्वामित्वाखालीं बुद्धानें ठेवला, हें लांच्छनास्पद होय, असें जे मानतात त्यांनीं बुद्धानें स्त्रियांना दिलेलें स्वातंत्र्य लक्षांत घेतलें, तर ते आपला आरोप चुकीचा आहे, हें मान्य करतील. बुद्धानें स्त्रियांना जें स्वातंत्र्य दिलें तें तकलुपी नव्हतें. स्त्रियांनीं त्या स्वातंत्र्याचा मनमुराद आस्वाद घेतला. त्यांनीं त्याचे पोवाडे गाइले. मुत्ता ही ब्राह्मणाची मुलगी. भिक्कुणी झाल्यानंतर तिनें एकदां असे उद्गार काढले, "अहाहा! मी खरोखरच स्वतंत्र आहे!! माझ्या स्वातंत्र्याला सीमा नाहीं!!!" (Psalms of the Sisters. No. XI). दुसरी ब्राह्मणकन्या मेत्तिका. भिक्कुणी झाल्यानंतर तिनें एकदां असे उद्गार काढले, "........मी या शिळेवर दररोज ध्यानस्थ बसत, तेव्हां स्वातंत्र्याचे श्वासोच्छ्वास माझ्या आध्यात्मिक साधनेवरून एकसारखे वाहात असतात."

या संबंधात मिसेस् ऱ्हिस् यांचे उद्गार ( Psalms of the Sisters No. XXIV ) फार महत्त्वाचे आहेत. ते असेः—"भारतांतील स्त्रियांनीं, हें स्वातंत्र्य मिळविण्याच्या अगोदर, समाजांतील आणि कुटुंबांतील आपला दर्जा याला तिलांजलि दिली. ख्रिस्ती धर्मातील जोगिणींना हें दिव्य पुढील काळांत करावें लागलें. या स्त्रियांनीं आपल्या जीवनाचा प्रवाहच बंद केला. आणि त्या वाऱ्याप्रमाणें स्वतंत्र झाल्या. हें सर्व त्यांनीं केवळ आध्यात्मिक ज्ञानार्जनासाठीं केलें. आपल्या स्त्रीजीवनाला मूठमाती देऊनच या स्त्रियांनीं संघांत आदराचें, प्रेमाचें आणि सुरक्षिततेचें स्थान प्राप्त करून घेतलें. केशवपन केलेल्या अवस्थेंत भिक्कुणीचा पोषाख करून त्या आध्यात्मिक ज्ञानार्जनासाठीं निबिड अरण्यांतील कोणत्याहि निर्जन स्थळीं जाऊन अगर उंच उंच अशा गिरिशिखरावर चढून जाऊन ध्यानस्थ होऊन बसत असत. जाडाभरडा पोशाख

करण्यांत त्या जशा भिक्कूशीं बरोबरी करीत होत्या त्याचप्रमाणें त्या अत्यंत गहन आणि त्रासदायक आध्यात्मिक ज्ञानार्जनांतहि भिक्कूशीं बरोबरी करीत होत्या."

स्त्रियांना भिक्कुणी होण्याचा हक्क देऊन बुद्धानें त्यांना स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करून दिला. एवढेंच नव्हे तर लिंगभेदाबद्दल मनांत यत्किंचित् हि अढी न बाळगतां बुद्धानें स्त्रियांना थोर पदाला जाऊन पोहचण्याचा मार्ग मोकळा करून दिला. या संबंधांत मिसेस् ऱ्हिस् डेव्हिडस् यांचे आणखी दुसरे उद्गार लक्षांत घेण्यासारखे आहेतः—

"भिक्कुणी झालेल्या स्त्रीला 'अरहंत' पदवीला गेलेल्या भिक्कू बंधूंनीं, तिचें स्त्रीत्व लक्षांत न घेतां, एक विचारशील मानव म्हणूनच मानावें, हीच तिची एकमेव इच्छा होती. असें झाल्यानंतर तिला जो निर्मळ व सोज्वळ आनंद होत होता, त्या आनंदाच्या धुंद मोहिनींत ती आपलें भिक्कुणीचें सर्व जीवन जगत होती. अशा प्रकारच्या जीवनांत ती आध्यात्मिक वातावरणाचे श्वासोच्छास घेत होती. विश्वांतील सर्व वस्तूंना सत्य स्वरूपांत पाहण्याची जी जागृतावस्था त्रिपिटक, अरिया, इत्यादि धार्मिक ग्रंथांतून वर्णन केलेली आहे, ती अवस्था तिनें स्वतःच्या ज्ञानशक्तीनें प्राप्त करून घेतलेली होती. ती त्या अवस्थेशीं एकजीव झालेली होती.

भिक्कुणी सोमा म्हणते, 'स्त्रीचें नैसर्गिक जीवन हें आमच्या—अरियांच्या—आड कसें येऊं शकतें?' ( Psalms No. XVI ).

"ही स्त्री, हा पुरुष, इत्यादि भेदाभेद जो आपल्या मनांत सदैव बाळगतो त्याला कोणत्या दर्जाचा मानव समजावें? मी स्त्री आहें कीं पुरुष? हे दोन्ही नसेल तर मी कोण? असले प्रश्न आध्यात्मिक वातावरणांत रहाणाऱ्यांच्याहि मनांत उत्पन्न होतात. असले लोक अशा प्रश्नांची चर्चा माराबरोबर ( मदनाबरोबर ) करण्यास लायक आहेत, असेंच समजलें पाहिजे."

बुद्धानें स्त्रियांना भिक्कुणी होण्याचा हक्क दिला, त्यामुळें स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मार्ग खुला झाला. एवढेंच नव्हें तर, पुरुषांच्या दर्जाबरोबर स्त्रियांचा दर्जा समान होण्याचा मार्ग मोकळा झाला. या बाबतींत मिसेस् ऱ्हिस् डेव्हिडस् यांचे आणखी दुसरे उद्गार लक्षांत घेण्यासारखे आहेत.

( Preface to Therigatha, pp. XXVI—XXVII ):—
"तांत्रिक दृष्टीनें भिक्कुणी भिक्कूंच्या हाताखालीं रहात होत्या, हें खरें आणि हेंहि तितकेंच स्पष्ट आहे कीं, भिक्कू संघांत जो पुरुष ज्ञान आणि श्रेष्ठत्व यामुळें उच्च पदावर विराजमान झालेला होता त्याच्या बरोबरीचा दर्जा भिक्कुणी संघांतील थेरी हक्कानें मिळवूं शकत होती. कस्सप हा आध्यात्मिक बाबतींत श्रेष्ठ होता. तो संघांत प्रमुख होता. त्याचा दर्जा संघसंस्थापक बुद्ध याच्या खालोखाल होता. आध्यात्मिक बाबतींतल्या अशा महान कस्सपाबरोबरीचा समान दर्जा भद्दा या थेरीनें मिळविलेला होता. याबद्दलचा उल्लेख धर्मसूत्रांत (३७) आहे. या बाबतींत हें स्पष्ट केलें पाहिजे कीं, परिव्रजा घेण्यास येणाऱ्या स्त्रियांवर, ती कुमारी असली पाहिजे, असा दंडक घातलेला नव्हता. विवाहित, अविवाहित, विधवा आणि वेश्या अशा सर्व प्रकारच्या स्त्रियांना परिव्रजा घेण्यास बुद्धानें संघाचा दरवाजा खुला ठेवलेला होता. यामुळें सर्व प्रकारच्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें स्वातंत्र्य, समता, महत्तता, आणि आत्मविकास, हीं मानवी जीवनाचीं सर्व अंगें प्राप्त करून घेतां येत होतीं."

— ४ —

प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील स्त्रियांचा सामाजिक दर्जा फार उच्च होता. तो अर्वाचीन काळांत खालीं घसरत आला. यायद्दल शंका नाहीं. प्राचीन काळांत स्त्रिया राज्यकारभारांत आघाडीवर होत्या कीं नाहीं, यासंबंधीं कोणालाहि ज्यास्त माहिती सांगतां येणार नाहीं. परंतु देशांतील बौद्धिक आणि सामाजिक जीवनांत स्त्रियांचा दर्जा फार उच्च दर्जाचा होता, याबद्दल कोणालाहि संशय बाळगता येणार नाहीं.

मुलीची ब्रह्मचर्यावस्था संपलेली आहे आणि आतां ती विवाहाला योग्य झालेली आहे, असा अथर्व वेदांत उल्लेख आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, पूर्वींच्या काळांत स्त्रियांचा उपनयनविधि करण्याचा प्रवात होता. श्रौत सूत्रांतील उल्लेखावरून असें दिसतें कीं, स्त्रिया वेदांतील मंत्र म्हणत असत. त्या वेदाभ्यासहि करीत असत. स्त्रिया गुरुकुलांत ( विद्यापीठांत ) वेदांच्या निरनिराळ्या शाखांचा अभ्यास करीत असत. त्या मीमांसा तत्त्वज्ञानांत निष्णात झालेल्या होत्या, असें पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथांतील उल्लेखांवरून

स्पष्ट होतें. गुरुकुलांत स्त्रिया अध्यापक म्हणूनहि काम करीत होत्या. त्या विद्यार्थिनींना वेद शिकवीत होत्या. हें सर्व पतंजलीच्या भाष्यावरून दिसून येतें. धर्म, तत्त्वज्ञान, विश्वाची उत्पत्ति, ज्ञानविकास, इत्यादि गहन आणि जटिल विषयांवर पुरुषांच्याबरोबर वादविवाद करणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यांचीं बरींचशीं उदाहरणें इतिहासांत नमूद केलेलीं दिसून येतात. जनक आणि सुलभा, याज्ञवल्क्य आणि गार्गी, याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी, तसेंच शंकराचार्य आणि विद्याधरी यांचे वादविवाद सार्वजनिक ठिकाणीं झालेले होते, असें इतिहास सांगतो. यावरून हेंच सिद्ध होतें कीं, मनूच्या पूर्वीच्या काळांत हिंदुस्थानांतील स्त्री विद्याभ्यासाच्या जोरावर समाजांत उच्चतम पदीं जाऊं शकत होती.

पूर्वीं स्त्रियांना समाजांत मोठ्या मानापानानें वागविलें जात होतें, हें कोणीहि नाकबूल करूं शकत नाहीं. प्राचीन काळांत राज्याभिषेकाचे समारंभ होत असत. त्यांत राणीला प्रमुख स्थान असे. राज्यारोहणानंतर राजा दरबारांत सर्वांना नजराणे देत असे. तेव्हां तो राणीलाहि मोठा नजराणा देत असे. ( Jaiswal-Indian Polity, part II, p. 16 ). राज्यारोहणाच्या अगोदर राजा आपल्या अनेक पत्नींतून एकीला पट्टराणी म्हणून निवडत असे. पट्टराणी आणि खालच्या जातींतील त्याच्या इतर बायका यांची तो राज्याभिषेकाच्या वेळीं यथाविधि पूजा करीत असे. ( gaiswal-Indian Polity, part II, p. 17 ). राज्यारोहणानंतर तो आपल्या राज्यांतील श्रेष्ठ श्रेणींच्या ( व्यापारी, श्रीमंत ) स्त्रियांना नमस्कार करीत असे. ( Jaiswal-Indian Polity, part II, p. 82 ).

ज्या वेळीं जगांतील कोणत्याहि देशांत स्त्रियांना इतका मानसन्मान मिळत नव्हता त्यावेळीं भारतांतील स्त्रियांना तो मिळत होता. त्यांची नंतर जी अवनति झाली ती कोणामुळें ? हिंदूंना धार्मिक कायदे तयार करून देणाऱ्या मनूमुळें ! याव्यतिरिक्त या प्रश्नाला दुसरें उत्तर नाहीं. याबद्दल कोणाला शंका येत असेल तर त्यानें मनुस्मृतींत मनूनें स्त्रियांच्या एकंदर जीवनासंबंधीं जे धार्मिक कायदे लिहून ठेवले आहेत ते पहावेत. त्यांपैकीं कांहीं कायद्यांची मी येथें माहिती देतों.

२-२१३ पुरुषांना आकर्षित करून भ्रष्ट करणें, हें स्त्रियांचें जीवनवैशिष्ट्य होय. या कारणामुळें ज्ञानी लोक स्त्रियांच्या सान्निध्यांत सदैव जागरूक अवस्थेंत रहातात.

२-२१४ कारण, स्त्री या जगांतील मूर्ख पुरुषांनाच केवळ नव्हें तर विद्यासंपन्न पंडितांनाहि वाम मार्गाला नेऊन त्याला काम आणि क्रोध यांचा गुलाम करते.

२-२१५ आपली माता, भगिनी आणि कन्या यांच्या एकांत सहवासांत कोणीहि राहूं नये; कारण, इंद्रियें हीं प्रबळ आहेत, आणि तीं विद्यासंपन्न पंडितालाहि आपल्या जाळ्यांत ओढतात.

९-१४ स्त्रिया पुरुषांच्या सौंदर्याकडे लक्ष देत नाहींत, किंवा त्यांच्या वयाकडे बघत नाहींत. 'हा पुरुष आहे', एवढेंच मनांत आणून त्या स्त्रिया पुरुषाच्या स्वाधीन होतात. मग तो सुंदर असो अगर कुरूप असो.

९-१५ स्त्रियांना पुरुषांबद्दल इतकें आकर्षण असतें कीं, पतींनीं त्यांच्या वर कितीहि कडक पहारा ठेवला तरी त्या स्वभावतःच चंचल व निर्दय असल्यामुळें परपुरुषांशीं व्यभिचार करतात, आणि पतीचा विश्वासघात करतात.

९-१६ परमेश्वरानें स्त्रियांना निर्माण करतांना त्यांच्यांत हे विघातक दुर्गुण घातले. ते लक्षांत घेऊन प्रत्येक माणसानें स्त्रियांपासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं दक्ष राहिलें पाहिजे.

९-१७ शय्येबद्दल ओढ, आराम व चैन यांचें आकर्षण, दागिने व अपवित्र वासना यांची हाव, क्रोध, लबाडी, मत्सर, आणि दुर्वर्तन, हे सर्व दुर्गुण स्त्रियांना निर्माण करतांना मनूनें (निर्माता ईश्वर) त्यांच्या अंगांत घातले.

मनु स्त्रियांना किती हीन दर्जावर ठेवीत होता, हें त्याच्या या धार्मिक कायद्यां-वरून स्पष्ट होतें. त्याचें स्त्रियासंबंधींचे इतर कायदेहि याच नमुन्याचें आहेत. कोणत्याहि परिस्थितींत स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये, असें मनूचें मत होतें.

९–२ कुटुंबांतील पुरुषांनीं आपल्या कुटुंबांतील स्त्रियांना रात्रंदिवस आपल्यावर अवलंबून ठेवावें. त्या स्त्रियांचा कल जर वैषयिक उपभोगांकडे आहे असें दिसून आलें तर त्यांना पुरुषांनीं आपल्या कह्यांत ठेवावें.

९–३ स्त्रीच्या लहानपणांत बाप तिचें पालनपोषण करतो, नवरा तिच्या तरुणपणांत तिचें संरक्षण करतो, आणि तिचे मुलगे तिच्या वृद्धावस्थेंत तिचें संरक्षण करतात. स्त्री स्वातंत्र्याला केव्हांहि लायक नसते.

९–५ वाम मार्गाकडे यत्किंचित् जरी स्त्रीचा कल दिसूं लागला तरी त्या वाम मार्गापासून तिला प्रवृत्त करण्याची विशेष दक्षता घेतली पाहिजे. तसें केलें नाहीं तर ती स्त्री दोन्हीं कुळाला दुःखाच्या खाईंत टाकील.

९–६ सर्व जातींच्या श्रेष्ठतम कर्तव्याचें महत्त्व लक्षांत घेतले तर असेंच ठरतें कीं, अगदी नेभळट नवऱ्यांनीं सुद्धां स्वतःच्या बायकांना आपल्या मुठींत ठेवून त्यांचें संरक्षण करण्याचें प्रयत्न करीत रहावें.

५–१४७ कुटुंबांतली मुलगी, तरुणी, वृद्ध स्त्री यांना कुटुंबांतील व्यवहाराच्या बाबतींत स्वतंत्रपणें कांहींहि करण्याचा अधिकार नाहीं.

५–१४८ स्त्रीनें लहानपणांत वडिलाच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे. पतिमृत्युनंतर तिनें आपल्या पुत्रांच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे. स्त्रीनें स्वतंत्रपणें कधींच राहूं नये.

५–१४९ पिता, पति आणि पुत्र यांच्यांपासून विभक्तपणें राहण्याचें धैर्य स्त्रियांनीं करूं नये. त्यांना सोडून ती राहूं लागली तर त्यामुळें दोन्ही कुटुंबें (पतीचें आणि पित्याचें इतरांच्या तिरस्कारास पात्र होतील.

स्त्रीला घटस्फोट घेण्याचा हक्क नाहीं.

९–४५ पति स्वतःच्या पत्नीबरोबर एकजीव झाला, असें मानण्यांत येतें. याचा अर्थ असा कीं, स्त्री एकदां विवाहित झाली कीं तिला पतीपासून वेगळें राहणें त्रिकाळ अशक्य होतें.

पत्नीला पतीपासून विभक्त रहाण्यास मनाई करणारा कायदा मनूनें केला त्याबद्दल बरेच हिंदू लोक त्याची मनसोक्त स्तुति करतात. आणि असा कायदा इतर देशांत नाहीं, म्हणून ते अभिमानानें सांगतात. एवढ्यांतच समाधान मानून ते स्वस्थ बसतात. मनूनें विवाह हा पवित्र विधि मानला म्हणूनच त्यानें घटस्फोटाला मान्यता दिली नाहीं, अशा विचारानें हिंदु आपल्या सदसद्विवेक बुद्धीची समजूत घालतात. परंतु ही विचारसरणी सत्याला धरून नाहीं, हें खास. मनूनें घटस्फोटाच्याविरुद्ध जो कायदा केला त्यांत त्याचा हेतु अगदीं वेगळा होता. पुरुषाला स्त्रीबरोबर जखडून ठेवणें, आणि पुरुषाला हवें तसें वागण्याचें स्वातंत्र्य देणें, हा मनूचा हेतु होता.

पत्नीला सोडून देण्याच्या बाबतींत मनूनें पतीवर कोणतेंहि बंधन घातलेलें नाहीं. पत्नीला सोडून देण्याची मोकळिक मनु पतीला देतो. या कायद्यानें मनूनें जें साधलेलें आहे तें हें कीं, स्त्रीला स्वातंत्र्याचा यत्किंचित्हि उपभोग घेता येऊं नये. या संबंधांत मनु काय म्हणतो तें पहाः—

> ९–४६ पतीनें पत्नीची विक्री केली, किंवा त्यानें तिचा त्याग केला, तरी ती पतीपासून विभक्त होऊं शकत नाहीं.

याचा अर्थ असा कीं, पतीनें पत्नीचा विक्रय अगर त्याग केला तरी ती त्यानंतर दुसऱ्याची ( विकत घेणाराची अगर तिला आश्रय देणाराची ) कायदेशीर पत्नी होऊं शकत नाहीं. ही घटना जर मनःप्रक्षोभक मानली नाहीं तर या जगांत दुसरें कांहींहि मनःप्रक्षोभक मानतां येणार नाहीं! हा कायदा करतांना मनूच्या मनाला न्याय आणि अन्याय याची बिलकूल चाड वाटली नसावी. बौद्ध काळांत स्त्रीला जें संपूर्ण स्वातंत्र्य होतें तें हिरावून घेणें, एवढेंच त्याला कायद्यानें साध्य करावयाचें होतें. स्त्रीस्वातंत्र्य मनूच्या डोळ्यांत सलत होतें. म्हणूनच तें नष्ट करून त्यानें स्त्रीला दास्यकर्दमांत रोवून ठेवलें ! !

कुटुंबाच्या स्थावरजंगम मालमत्तेच्या हक्कासंबंधीं मनूनें स्त्रीला गुलामाच्या पायरीवर नेऊन ठेवलें.

> ९–४१६ कुटुंबांतील पत्नी, पुत्र आणि गुलाम यांना कुटुंबाच्या मालमत्तेवर कांहींहि हक्क नाहीं. ते जी मालमत्ता स्वकष्टानें मिळवतात तीसुद्धां कुटुंबांतील त्यांच्या मालकाची असते.

एकत्र कुटुंबांतील एकादा पुरुष मरण पावला तर त्याच्या विधवा पत्नीचा त्या कुटुंबाच्या मालमत्तेतून पोटगीचा हक्क मनु मान्य करतो. पतीला मृत्यु आला तेव्हां जर तो कुटुंबांतून वेगळा रहात असेल तर त्या कुटुंबाच्या मालमत्तेतील वाटा मागण्याचा हक्क मनूनें तिला दिलेला आहे. परंतु या सर्व बाबतींत मनूनें विधवेचा मालमत्तेवरील अबाधित मालकी हक्क मान्य केलेला नाहीं.

मनूच्या कायद्यान्वयें स्त्रीला देहांत शिक्षा देतां येते. आपल्या पत्नीला मारहाण करण्याचा पतीचा हक्क मनूनें मान्य केलेला आहे.

८–२९९ पत्नी, मुलगा, नोकर ( गुलाम ), विद्यार्थी आणि धाकटा भाऊ यांनीं जर कांहीं अपराध केला तर त्यांना दोर अगर दुभंगलेला कळक यांनीं मारण्याचा हक्क कुटुंबांतील प्रमुख पुरुषाला आहे, असें मनु मान्य करतो.

स्त्रीला ज्ञानार्जनाचा हक्क नाहीं, असा मनूचा कायदा आहे. मनूनें स्त्रीच्या वेदाध्ययनावर बंदी घातलेली होती.

२–६६ स्त्रियांचे सुद्धां संस्कारविधि केले पाहिजेत. परंतु ते करतांना वैदिक मंत्र म्हणूं नयेत.

यज्ञविधि करणें हें ब्राह्मणी धर्माचे पंचप्राण होत. स्त्रियांनीं यज्ञविधी करूं नयेत, असा मनूचा दंडक आहे. या संबंधीं त्याचा कायदा असा आहेः—

१६–३६–३७ वेदविहित नित्य यज्ञविधी स्त्रियांनीं करूं नयेत. त्यांनीं ते केले तर त्यांना नरकवास प्राप्त होईल.

यज्ञविधी करणें स्त्रियांना अशक्य व्हावें, यासाठीं मनूनें असा दंडक घातला कीं, ब्राह्मण पुरोहितांनीं असल्या यज्ञविधींना साहाय्य करूं नये, अगर त्यांत भाग घेऊ नये.

मनूनें स्त्रियांच्या पुढें स्त्रीजीवनाचा कोणता आदर्श ठेवलेला होता, याबद्दल शेवटीं चार शब्द सांगणें जरूर आहे. मनूच्या शब्दांतच तो आदर्श आपण पाहूं याः

५–१५१ पित्यानें अगर त्याच्या संमतीनें तिच्या बंधूनें स्त्रीला ज्या पुरुषाला लग्नविधींत अर्पण केलें असेल त्या पुरुषाच्या म्हणजे पतीच्या सदैव आज्ञेंत राहणें, हें स्त्रीचें परम पवित्र कर्तव्य होय. तो पति मृत्यु पावला तर त्याच्या विधवेनें त्याच्या नांवाला कलंक लागेल असें कधींहि वर्तन करूं नये.

५–१५५ पत्नीनें पतीच्या संमतीशिवाय यज्ञविधी, तपाचरण, उपोषण, हीं कधींहि करूं नयेत. ती पतीच्या संपूर्ण आज्ञेंत राहिली तर तिचा मृत्युनंतर स्वर्गांत मोठा गौरव होईल.

स्त्रियांच्या आदर्शमय जीवनाबद्दल मनूचे आणखी जे दुसरे कायदे आहेत ते त्या आदर्शाचे अर्क समजले पाहिजेत. ते कायदे असेः—

५–१५३. ज्यानें स्त्रीबरोबर वैदिक मंत्रांनीं लग्नविधि साजरा केला तो त्या स्त्रीचा पति होय. तिला सदासर्वकाळ आणि तिच्या या जगांतील आणि स्वर्गांतील वास्तव्यांत सुखाचा अखंड झरा होतो. हें तिनें मनांत सदैव मानलें पाहिजे.

५–१५०. पत्नीनें सदासर्वकाळ आनंदित राहिलें पाहिजे. घरांतील सर्व कामें व्यवस्थित करणें, भांडींकुंडीं स्वच्छ ठेवणें आणि घरखर्च हात राखून करणें, या सर्व बाबतींत तिनें सावधानपूर्वक वर्तन केलें पाहिजे.

हिंदू या कायद्यांना स्त्रियांच्या जीवनाचे उच्चतम आदर्श मानतात !

स्त्रियांच्या जीवनावर आघात करणारे जे कायदे मनूनें केले त्याच्यावर कळस चढविणारा त्याचा दुसरा कायदा म्हणजे, स्त्रीहत्या ही उपपातक ( अगदीं क्षुल्लक गुन्हा ) मानणें, हा होय.

११–६७. मद्यपान करणें, स्त्री, शूद्र, वैश्य अथवा क्षत्रिय, आणि निरीश्वरवादी यांचा शिरच्छेद करणें, हे क्षुल्लक गुन्हे होत.

स्त्री, शूद्र, वैश्य अगर क्षत्रिय यांचा शिरच्छेद करणें, हें उपपातक होय, असा मनूनें जो कायदा केला त्याचें इंगित कोणीहि समजूं शकेल. तें हें कीं, ब्राह्मण हे सर्व वर्णांत श्रेष्ठ होत, असें समाजाच्या माथीं मारणें, आणि ब्राह्मणाचा शिरच्छेद करणें हें महापातक होय, असें समाजाला मान्य करावयास भाग पाडणें. परंतु मनूनें उपपातकाचा कायदा स्त्रियांना कां लागू केला ? याचें कारण एकच. मनूच्या दृष्टीनें स्त्री ही सामाजिक जीवनांत तृणवत् समजली जावी.

मनूच्या स्त्रीविषयक कायद्यांतील कांहीं उतारे मी वर दिलेले आहेत. ते लक्षांत घेतां, मनु हा भारतांतील स्त्रियांचा अधःपात घडवून आणण्यास सर्वस्वी जबाबदार आहे, हें सत्य कोणी नाकारूं शकेल काय ? कदाचित् या

याची बऱ्याच लोकांना जाणीव असावी. परंतु त्यांना आणखी दोन गोष्टी माहीत नसाव्यात. मनूनें हे जे कायदे केले, त्यांत त्याचें वैशिष्ट्य काय, हें त्यांना माहीत नसावें. या कायद्यांत मनूनें स्वतःच्या बुद्धिमत्तेचें अगर मौलिकतेचें प्रदर्शन केलेलें दिसून येत नाहीं. ब्राह्मणी धर्माचा उदय भारतांत झाल्यानंतर ब्राह्मणांची स्त्रियासंबंधीं जी विचारसरणी होती तीच मनूनें आपल्या कायद्यांत गोवली. मनूच्या पूर्वीं ती समाजांत रूढ होती. पण ती सामाजिक सिद्धांत म्हणून. त्या सिद्धांताला धार्मिक कायद्याचें रूप देऊन ते कायदे राजाज्ञेनें समाजांत पाळले जावेत, ही कामगिरी मनूनें केली. स्त्रियांवर एवढीं कडक बंधनें मनूनें कां लादलीं, याचें कारण या लोकांना समजलें नाहीं. ही दुसरी गोष्ट होय. आर्य समाजांतून शूद्र आणि स्त्रिया यांचा बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठीं एकसारखा मोठा लोंढा वाहत होता. शूद्र आणि स्त्रिया आर्य समाजाचे आणि धर्माचे आधारस्तंभ होते. ते आधारस्तंभच कोसळल्यावर आर्य समाज आणि धर्म हे नष्ट होण्याच्या मार्गाला लागले होते. तेव्हां हा लोंढा थांबविण्यासाठीं मनूला कायद्याचा मोठा बांध तयार करणें भाग पडलें.

मनूनें स्त्रियांच्यावर बंधनें लादून त्यांचें जीवन कायमचें खुरटें करून टाकलें, तें बौद्ध धर्माकडे असलेला स्त्रियांचा ओढा नष्ट करण्यासाठींच, हें सत्य आहे. हें ज्यांना पटत नसेल त्यांनीं मनुस्मृतींतलीं खालील बंधनें लक्षांत घ्यावींतः—

५–८८ मिश्रविवाहापासून ज्यांचा जन्म झाला, जे संन्याशी झाले ज्यांनीं आत्महत्या केली, अशा लोकांचे प्रेतसंस्कार आणि त्यानंतरचे इतर संस्कार करण्यांत येऊं नयेत.

५–८९ ज्या स्त्रियांनीं निरीश्वरवादी धर्म स्वीकारलेला आहे, ज्या स्त्रिया स्वातंत्र्यानें प्रेरित होऊन निर्भयपणें जीवन घालवितात, ज्या स्त्रियांनीं गर्भांतील मुलाला इजा केलेली असते, अगर ज्या स्त्रिया दारू पितात, अशा स्त्रियांचे प्रेतसंस्कार आणि त्यानंतरचे इतर संस्कार करण्यांत येऊं नयेत.

प्रेतसंस्कारासंबंधींचीं हीं आणि इतर बंधनें मनूनें घातलीं, त्याचा हेतु हा कीं, ( १ ) जे संन्याशी झाले, आणि ( २ ) ज्या स्त्रिया निरीश्वरवादी झाल्या,

त्यांच्यांवर समाजानें संपूर्ण बहिष्कार घालावा, आणि त्यांच्या प्रेतांना. सन्मानानें वागवूं नये. मनूनें संन्याशी आणि निरीश्वरवादी धर्म यांचा उलेख केलेला आहे, तो कोणाला उद्देशून आहे, हें स्पष्ट केलें पाहिजे. संन्याशी म्हणजे ज्यांनीं घरदार आणि संसार सोडून परिव्रजादीक्षा घेतली ते. निरीश्वरवादी धर्म म्हणजे बौद्ध धर्म. या सर्व गोष्टींचा रोख बौद्ध धर्मीय लोकांकडे होता. मनूच्या मनांतील या दोन गोष्टी स्पष्ट होतात. हीं बंधनें घालण्यांत मनूचा हाच हेतू होता कीं, ब्राह्मणांनीं व इतरांनींहि हे विधी करूं नयेत. असले विधी होत नाहींत, हें समाजाला दिसून आलें कीं समाजानें त्या लोकांच्या कुटुंबांना, त्या लोकांना जातिबहिष्कृत करण्यास भाग पाडावें. ज्यांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि जे बौद्ध धर्माप्रमाणें जीवन व्यतीत करीत होते त्यांना कुटुंबांतून आणि समाजांतून बहिष्कृत करणें, हा आपला हेतु साध्य करण्यासाठींच मनूनें आपल्या स्मृतींत हे धार्मिक कायदे तयार करून घातले. कारण, तो बौद्ध धर्माचा कट्टर विरोधक होता. स्त्रियांच्या जीवनावर मनूनें जीं क्रूर बंधनें लादलीं त्याचें मर्म हेंच कीं, बौद्ध धर्म नष्ट व्हावा. त्यासाठीं मनू धडपडत होता. बौद्ध धर्म नष्ट करण्याचा एक मार्ग म्हणजे बौद्ध धर्मापासून आर्य कुटुंबें दूर ठेवणें. आणि तीं ब्राह्मणी वर्चस्वाच्या पंजाखालीं कायमचीं ठेवणें. कुटुंबांतील आधारस्तंभ म्हणजे स्त्री. स्त्रियांची स्थिति कुटुंबांतच गुलामाच्या स्थितीपेक्षांहि हीन करणें, हा उपाय मनूनें योजला. हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या मोठेपणाचा ऱ्हास आणि स्त्रियांची अवनति, याबद्दलची सारी जबाबदारी मनूच्या माथ्यावर लादली पाहिजे. ती बुद्धावर लादतां येत नाहीं.

हिंदु स्त्रियांची उन्नति आणि अवनति, यासंबंधाची हकिकत या लहानशा लेखांत सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्यांची अवनति घडवून आणण्यास कोण कारणीभूत झाला, यासंबंधाचें स्पष्टिकरणहि मी दिलेलें आहे. स्त्रियांच्या उध्वस्त जीवनाची जबाबदारी बुद्धाच्या अंगीं चिकटविण्याचा प्रयत्न पूर्वग्रह मनांत नसलेले आणि सत्यनिष्ठ असलेले लोक करणार नाहींत, अशी मी आशा करतो. बुद्धानें स्त्रियांना समाजांत आदरणीय स्थान दिलें, आणि पुरुषांच्या बरोबरीच्या पातळीवर त्यांनां आणून बसविलें, हें त्रिवार सत्य होय !

| | | |
|---|---|---|
| १७ | अंगुत्तर निकाय, भाग १ | ७- |
| १८ | समझोजन अथव दास भाव वंदन | ०-३ |
| | **भिक्खु धर्मरक्षित** | |
| १९ | विसुद्धिमग्ग, भाग १ | १०-०० |
| २० | ,, भाग २ | ८-०० |
| २१ | आचार्य बुद्धघोस | १-०० |
| २२ | तथागत का प्रथम उपदेश | ०-२५ |
| २३ | तेलकताहा गाथा | ०-२५ |
| २४ | बुद्ध कालीन भारत का भौगोलिक परिचय | ०-५० |
| २५ | पाली पाठमाला | १-०० |
| २६ | जातिभेद और बुद्ध | ०-५० |
| २७ | बुद्ध सिसु बोध | ०-२५ |
| २८ | बुद्ध चरीय विधी | ०-३७ |
| २९ | इतिउत्तक | ०-७५ |
| ३० | सारनाथ और वाराणसी | १-२५ |
| | **भिक्खु जगदीश कश्यप, एम्. ए.** | |
| ३१ | उदान | १-२५ |
| | **भिक्खु धर्मरक्षित आणि जगदीश कश्यप** | |
| ३२ | संयुत्त निकाय, भाग १ | ७-०० |
| ३३ | ,, भाग २ | ६-०० |
| | **भिक्खू जे कश्यप आणि राहुळ सांस्कृतायन** | |
| ३४ | दीघ निकाय | ६-५० |
| | **पंडित राहुळ सांस्कृतायन** | |
| ३५ | धम्मपद | १-५० |
| ३६ | बुद्धचरीय | ८-०० |
| ३७ | भारत में बुद्ध धर्म का उत्तान और पतन | ०-२५ |
| ३८ | महामानव बुद्ध | २-५० |
| | **भदंत बोधानंद महा थेर** | |
| ३९ | बुद्ध चरिय पद्धति | १-७५ |
| ४० | भगवान गौतम बुद्ध | १-५० |
| | **भिक्खु धर्मरत्न** | |
| ४१ | खुद्दक पाठ | ०-३१ |

REFBK-0011558

सुत्तनिपात–मूळ व भाषांतर

-३ सुत्त–भाग १

४ थेर गाथा

**देवमित्त धर्मपाल**

४५ भगवान बुद्ध का शिक्षा

**पं० एच्. सद्धातिस्स थेर**

४६ सरल पाली शिक्षा

**कोसेट्सु नोसु**

४७ भगवान बुद्ध का जीवन चरित
( Life of Buddha in Frescoes )

**मराठी**

**ए. आर्. कुलकर्णी**

४८ धम्मपद

## Buddhist Pictures

49 Sarnath Buddha Image Picture

50 Do (Tricolour)

51 Japanese Buddha Image

52 Tibetan Buddha Image

53 Ven. Anagarika Dharmapala

54 Tricolour Painting of Buddha's Enlightenment by Kosetsu Nasu

55 Relics of Sariputta and Maha Moggallana Arahans (with original caskets)

56 Mulagandhakuti Vihara Picture

57 Buddha Gaya Temple Picture

58 Bodhi Tree at Buddhagaya (Tricolour)

**MAHA BODHI BOOK AGENCY**
4-A, Bankim Chatterjee Street,
CALCUTTA, 12